# पनवेल महानगरपालिका
## जाहीर नोटीस

---

आयुक्त, पनवेल महानगरपालिका हद्दीत "स्वच्छता ही सेवा" अभियान राबविणेकरिता तांत्रिक मनुष्यबळ पुरविणेबाबत करणेकामी तातडीने इच्छुक पुरवठा धारक / व्यक्ती यांचेकडून जाहीर दरपत्रके मागवित आहे.

संबंधितांनी त्यांची दरपत्रके महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागात दिनांक २०/०९/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावीत. सदर दिनांकानंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

| अ.क्र. | कामाचे नाव | दर (प्रति मनुष्यबळ प्रति दिन) |
|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका हद्दीत "स्वच्छता ही सेवा" अभियान राबविणेकरिता तांत्रिक मनुष्यबळ पुरविणेबाबत. | रु. ................ |

- **कामाचा तपशिल :-** संस्थेने पुरविलेल्या तांत्रिक मनुष्यबळानी खालीदिलेली कामे करावयाची आहेत.

मोहीम/ उपक्रम

१. कार्य सत्र: गणेशोत्सव विसर्जन स्थळांवर स्वच्छता Rallies व सफाई मोहीम ठिकाणी स्वच्छता मोहीम कश्या प्रकारे राबवायची आहे याबाबत उपस्थित नागरिक व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी याना माहिती देणे.

२. सफाई साधने आणि PPE चे वितरण: उपस्थित नागरिक, स्वयंसेवक संस्थांचे प्रतिनिधी यांना हातमोजे, झाडू, कचरा पिशव्या आणि इतर आवश्यक साधने यांचे वाटप करणे.

३. परिसराची तपासणी: स्वच्छता करण्यासाठी आवश्यक साहित्य आणि किती प्रमाणात साफसफाईची आवश्यकता आहे हे तपासण्यासाठी दुर्लक्षित कचरा स्थानाचे संबंधित आरोग्य निरीक्षक यांच्या सोबत तपासणी करणे.

४. Before Photo- सफाई मोहीम सुरु करण्यापूर्वी संबंधित ठिकाणचे Before Status स्थितीचे GPS (Geo tagged) फोटो घेणे.

५. कार्य वाटप: गणेशोत्सव विसर्जन स्थळांवर स्वच्छता Rallies व सफाई मोहीम ठिकाणे तपासणी आधारावर आरोग्य निरीक्षक यांच्या सहाय्याने विविध स्वयंसेवक गटांना विशिष्ट क्षेत्र किंवा काही भाग स्वच्छतेसाठी नेमून देणे.

६. In progress Photo- सफाई मोहीम सुरु असताना संबंधित ठिकाणचे चालू सफाई मोहिमेचे Status स्थितीचे GPS (Geo tagged) फोटो घेणे.

७. स्वच्छता उपकरणे परत जमा करून घेणे: स्वच्छता मोहीम वेळी वाटप करण्यात आलेली सर्व स्वच्छता साधने आणि उपकरणे उपस्थित स्वच्छता मुकादम आणि सफाई कर्मचारी यांच्या मदतीने पुन्हा जमा करून घेणे.

८. After Photo- सफाई मोहीम पूर्ण झाले नंतर संबंधित ठिकाणचे सफाई मोहिम पूर्ण झाल्याचे, जागा संपुर्ण स्वच्छ झाल्यानंतर, घंटागाडीद्वारे संपूर्ण कचरा उचलून घेतल्यानंतर GPS (Geo tagged) फोटो घेणे.

९. अहवाल देणे: गोळा केलेल्या कचऱ्याचे प्रमाण आणि इतर संबंधित मुख्यालयाकडून मागण्यात आलेली माहिती जमा करणे आणि घनकचरा व्यवस्थापन विभाग मुख्यालयात जमा करणे.

१०. कार्यक्रमाचा समारोप करणे: मुख्य आरोग्य निरीक्षक किंवा आरोग्य निरीक्षक यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचा समारोप करणे. उपस्थित नागरिक आणि स्वयंसेवकांचे आभार व्यक्त करणे.

११. जनजागृती साहित्य तयार करणे: माहितीपूर्ण माहितीपत्रके, बॅनर तयार करणे आणि सोशल मीडियावर पोस्ट करणे.

१२. माहिती देणे: रीसायकलिंग, कंपोस्टिंग आणि कचरा कमी करण्यावर RRR Center ठिकाणी कार्यशाळा घेणे. नागरिकांना RRR Center विषयी माहिती देणे.

१३. अभिप्राय गोळा करणे: RRR Center मध्ये वस्तू जमा करणाऱ्या नागरिकांचे अभिप्राय व्हिडीओ घेणे.

१४. अहवाल देणे: RRR Center वर कार्यरत असणाऱ्या कर्मचारी यांच्या मदतीने जमा वस्तू व साहित्याचा अहवाल मुख्यालयास सादर करणे.

१५. RRR Center: RRR center ची उभारणी करणे आणि आवश्यक बॅनर लावून घेणे.

१६. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील शाळा व कॉलेज मध्ये स्वच्छ भारत अभियान स्पोर्ट्स लीग (PMC SBM Sports League) आयोजित करणे

१७. प्रभाग समिती अ व ब- नागरिकांची स्वच्छता वॉर्ड संवाद बैठक आयोजित करणे.

१८. प्रभाग समिती क व ड - नागरिकांची स्वच्छता वॉर्ड संवाद बैठक आयोजित करणे.

सायक्लोथॉन

१. नोंदणी आणि चेक-इन: सायक्लोथॉन नोंदणी प्रक्रिया राबविणे. सायक्लोथॉन नंबर वितरित करणे.

२. सेटअप आणि लॉजिस्टिक्स:नोंदणी बूथ, मदत केंद्रे आणि बॅनरच्या सेटअपमध्ये मदत करणे कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी सर्व उपकरणे आणि साहित्य जागेवर पोहोच झाले असल्याची खात्री करणे.

३. मार्ग व्यवस्थापन:मुख्य मार्ग आणि वळणांवर सायकलस्वार यांना मार्गाची माहिती प्रदान करणे आणि सायकलस्वार यांना अचानक उद्भवणाऱ्या समस्यांमध्ये मदत करणे.

४. Cyclothon Photo- संपूर्ण सायक्लोथॉन मोहिमेचे वेळोवेळी GPS (Geo tagged) फोटो घेणे.

५. फिनिश लाइन सहाय्य: फिनिश लाइन क्षेत्राच्या सेटअप आणि व्यवस्थापनास मदत करणे. पदके, पाणी आणि शर्यतीनंतरचे अल्पोपहाराचे वितरण करणे.

६. गर्दी नियंत्रण: सायक्लोथॉन सुरुवातीच्या आणि अंतिम क्षणी गर्दी नियंत्रित करणे. प्रेक्षक आणि सहभागी सायकलस्वार कार्यक्रम मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करत असल्याची खात्री करणे.

७. कार्यक्रम संपल्यानंतरची साफसफाई: कार्यक्रम संपल्यानंतर कार्यक्रम स्थळाचे मुख्य आरोग्य निरीक्षक आणि आरोग्य निरीक्षक यांच्याद्वारे साफसफाई करून घेणे. सर्व कार्यक्रम ठिकाणे स्वच्छ झाले असल्याची खात्री करणे.

एक पेड माँ के नाम' वृक्षारोपण मोहीम

१. वृक्षारोपण स्थळांवर पाहणी करणे: वृक्षारोपण मोहीम ठिकाणचे मुख्य कार्यक्रमापूर्वी संबंधित आरोग्य निरीक्षक यांच्या सोबत पाहणी करून वृक्षारोपण करीता किती रोपांची आवश्यकता आहे याची माहिती घेणे.

२. आवश्यक खड्डे घेणे आणि रोपट्यांचे वितरण: उपस्थित नागरिक, स्वयंसेवक संस्थांचे प्रतिनिधी यांना रोपटी व इतर आवश्यक साधने यांचे वाटप करणे.

३. Before Photo- वृक्षारोपण मोहीम सुरु करण्यापूर्वी संबंधित ठिकाणचे Before Status स्थितीचे GPS (Geo tagged) फोटो घेणे.

४. जनजागृती कार्यक्रम : स्वच्छता ही सेवा २०२४ आणि 'एक पेड माँ के नाम" याविषयी नागरिकांना मार्गदर्शन करणे. वृक्षारोपण मोहीम कश्या प्रकारे राबवायची आहे याबाबत उपस्थित नागरिक व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी याना माहिती देणे.

५. In progress Photo- वृक्षारोपण मोहीम सुरु असताना Status स्थितीचे GPS (Geo tagged) फोटो घेणे.

६. अहवाल देणे: वृक्षारोपण संख्या आणि इतर संबंधित मुख्यालयाकडून मागण्यात आलेली माहिती जमा करणे आणि घनकचरा व्यवस्थापन विभाग मुख्यालयात जमा करणे.

| |
|---|
| After Photo- वृक्षारोपण मोहीम पूर्ण झाले नंतर संबंधित ठिकाणचे GPS (Geo tagged) फोटो घेणे. |

- **अटी व शर्ती :-**

१) कामाचा कालावधी १६ दिवसाचावर्षाचा असेल.

२) स्वत:च्या नावाची संस्था / एजन्सी असल्यास प्राधान्य.

३) कार्यादेश दिल्यानंतर संबंधित संस्थंने सर्व कामे वेळेत व मुदतबध्द पध्दतीने व महानगरपालिका हद्दीतील नेमुन दिलेल्या ठिकाणी करणे आवश्यक राहील.

४) आपणांस नेमून दिलेल्या कामाचे स्वरुपानुसार सत्यता दस्ताऐवज मागणी बिलासोबत सादर करणेचे आहेत.

५) वरील प्रस्तावित कामाचे प्रत्येक काम निहाय स्वतंत्र भावपत्रक / कोटेशन विहित वेळेवर सादर करावे.

६) भावपत्रके स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांना राहतील.

वैभव विधाते

**उप आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**

घनकचरा व्यवस्थापन विभाग, पनवेल महानगरपालिका
जा.क्र.पमपा/घ.क.वि./२५२३/प्र.क्र.२२९/७४०/२०२४
दिनांक : १३/०९/२०२४